# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 27/07/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

क्रमांक :डीपी/३१-बी २ /मपोना-६९६ किरण आडे/6164/२०२० यवतमाळ दिनांक 24 JUL 2020

आ दे श

**मपोना /६९६ किरण आडे** यांना या कार्यालयाचे आदेश क्र.डीपी/३१-बी-२/मपोना ६९६ किरण आडे/सलग्न/४०८९/२०१९ यवतमाळ दि.१/६/२०२० अन्वये त्यांना त्यांचे कसुरी संदर्भाने पो.स्टे.महागाव येथुन पोलीस मुख्यालय,यवतमाळ येथे संलग्न करण्यात आले आहे.

**मपोना /६९६ किरण आडे** यांची पोलीस मुख्यालय,यवतमाळ येथे करण्यात आलेले सलग्न आदेश रद्द करण्यात येत असुन,त्यांना पो.स्टे.महागाव येथे पुर्वीच्या नेमणुकीच्या ठिकाणी परत करण्यात येत आहे.

( एम. राजकुमार )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, पो.स्टे.महागाव /रा.पो.नि.पो.मु.यवतमाळ

**प्रत -** वेतन लिपीक - 1 / कर्मचारी आस्थापना लिपीक/सआली 2/ डिपीजी लिपीक/ मपोना - ६९६ किरण आडे (महागाव) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

6155

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिब/पो.कर्म-हजर/ 2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 27 JUL 2020

---

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/सआलि-80सी/आंजिब-स्विकृती/3608/2020 दिनांक 20/04/2020 अन्वये पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे आस्थापनेवरील **पोशि/2632 गजानन जाधव** यांना या आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचे पत्र क्रमांक आशा-3/आंजिब-कार्यमुक्त/6500/2020 दिनांक 21/07/2020 अन्वये **पोशि/2632 गजानन जाधव** यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता दिनांक 22/07/2020 रोजी कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 25/07/2020 रोजी हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोशि/2632 गजानन जाधव** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन 2662 देण्यात येवुन त्यांची नेमणुक, पो.स्टे महागांव येथे करण्यात येत आहे.

**(एम.राज कुमार)**
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

पोशि/2662 गजानन जाधव नेमणुक, पो.स्टे महागांव

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे महागांव/पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ/राखीव पोलीस निरीक्षक, पो.मु.यवतमाळ

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-5/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

जावक क्रमांक :- पोअग्र/आलि-80 सी/आजिब/पो.कर्म-हजर/ 2020 6156
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 27 JUL 2020

---

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/सआलि-80सी/आंजिब/2356/5420/2020 दिनांक 06/07/2020 अन्वये पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे आस्थापनेवरील **पोशि/2919 शंकर चौधरी** यांना या आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे पत्र क्रमांक पोअचं/एसबी-1/आंजिब-कार्य/यवतमाळ/1458 /2020 दिनांक 16/07/2020 अन्वये **पोशि/2919 शंकर चौधरी** यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता दिनांक 17/07/2020 रोजी कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 22/07/2020 रोजी हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोशि/2919 शंकर चौधरी** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **2700** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, पो.स्टे वणी येथे करण्यात येत आहे.

**(एम.राज कुमार)**
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

पोशि/2700 शंकर चौधरी नेमणुक, पो.स्टे वणी

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे वणी/पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ/राखीव पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-5/राजपत्रं लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक /वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, चंद्रपुर

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

# भाग २ - रजा

क्रमांक : पोअय/सआली-४/सिक हजर/मपोना-१८७१ भारती/611 /२०२० यवतमाळ दिनांक

27 JUL 2020

आदेश

आपले शाखेतील मपोना/१८७१ भारती जगताप हया दिनांक १६.०६.२०२० ते २४.०७.२०२० पर्यत एकुण ३७ दिवस सिक रजेवर होत्या.तरी त्यांना कर्तव्यावर हजर करून घ्यावे.तसेच त्यांचा वर नमुद सिक कालावधी परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

(मा.पोअ.यांचे मान्यतेने)

( सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

प्रति

प्रभारी अधिकारी नक्षल सेल

प्रत वेतन लिपीक /डीपीजी

27 JUL 2020

क्रमांक : पोअय/सआली-४/सिक हजर/पोना-२२२७ नितीन/६११/२०२०          यवतमाळ दिनांक

आदेश          27 JUL 2020

आपले पोलीस स्टेशनतील पोना/२२२७ नितीन वास्टर हे दिनांक २४.०६.२०२० ते २६.०७.२०२० पर्यत एकुण ३३ दिवस सिक रजेवर होते.तरी त्यांना कर्तव्यावर हजर करून घ्यावे.तसेच त्यांचा वर नमुद सिक कालावधी परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

(मा.पोअ.यांचे मान्यतेने )

( सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

प्रति

ठाणेदार पो.स्टे.दिग्रस

प्रत वेतन लिपीक/डीपीजी

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक : पोअय/सआली-२/सु.वे.नि-७६८२/से.नि. पो.कर्म/२०२०, 6154

यवतमाळ दिनांक :- 24 JUL 2020

**आदेश**

शासन निर्णय क्रमांक वेपुर -२०१७/प्र.क्र.-१२/सुधारणा-८७/सेवा-९ दिनांक १९.०५.२०१७ अन्वये पोलीस विभागातील सशस्त्र पोलीस हवालदार यांचे ग्रेड पे सुधारणा करण्यात आली आहे. पुर्वीचे ग्रेड पे २४००/- सुधारीत ग्रेड पे २५००/- करण्यात आल्याने सपोउपनि/७६८ माणीक भगत (सेवा निवृत्त दिनांक ३०.०९.२०१७) यांचे वेतनामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**वेतन संरचना**
**पोलीस नाईक** ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-
**पोलीस हवालदार** ५२००-२०२०० ग्रेड पे २५००/-
**सपोउपनि** ५२००-२०२०० ग्रेड पे २८००/-

| मुळ आदेश | | | सुधारीत आदेश | | |
|---|---|---|---|---|---|
| वे. वा. दिनांक | वेतन | ग्रेड पे | वे.वा. दिनांक | वेतन | ग्रेड पे |
| ०१.०१.२००६ | ९३०० | २४०० | ०१.०१.२००६ | ९३०० | २५०० |
| ०१.०७.२००६ | ९६६० | २४०० | ०१.०७.२००६ | ९६६० | २५०० |
| ०१.०७.२००७ | १००३० | २४०० | ०१.०७.२००७ | ९६६०+३७०=१००३० | २५०० |
| ०१.०७.२००८ | १०४१० | २४०० | ०१.०७.२००८ | १००३०+३८०=१०४१० | २५०० |
| ०१.०७.२००९ | १०८०० | २४०० | ०१.०७.२००९ | १०४१०+३९०=१०८०० | २५०० |
| ०१.०७.२०१० | ११२०० | २४०० | ०१.०७.२०१० | १०८००+४००=११२०० | २५०० |
| ०१.०७.२०११ | ११६१० | २४०० | ०१.०७.२०११ | ११२००+४२०=११६२० | २५०० |
| ०१.०७.२०१२ | १२०३० | २४०० | ०१.०७.२०१२ | ११६२०+४३०=१२०५० | २५०० |
| ०१.०७.२०१३ | १२४७० | २४०० | ०१.०७.२०१३ | १२०५०+४४०=१२४९० | २५०० |
| ०१.०१.२०१४ पोहवा पदी पदोन्नती | १२९२० | २८०० | ०१.०१.२०१४ पोहवा पदी पदोन्नती | १२४९०+४५०=१२९४० | २८०० |
| ०१.०७.२०१४ | १३४०० | २८०० | ०१.०७.२०१४ | १२९४०+४८०=१३४२० | २८०० |
| ०१.०७.२०१५ | १३९८० | २८०० | ०१.०७.२०१५ | १३४२०+४९०=१३९१० | २८०० |
| ०१.०७.२०१६ | १४३९० | २८०० | ०१.०७.२०१६ | १३९१०+५१०=१४४२० | २८०० |
| ०१.०७.२०१७ | १४९१० | २८०० | ०१.०७.२०१७ | १४४२०+५२०=१४९४० | २८०० |

वरील नमुद पोलीस कर्म.यांना पदोन्नतीच्या दिनांकापासुन वरिष्ठ पदाचे ग्रेड वेतन आकारण्यात आले असले तर सदरची रक्कम समायोजीत करावी. तसेच वेतन निश्चितीच्या फरकाची रक्कम रोखीने देय राहिल.सदरचा खर्च २०५५ जिल्हा पोलीस बल वेतन -०१ या लेखाशिर्षाखाली मंजुर व उपलब्ध असलेलया अनुदानातुन भागविण्यात यावा.

(एम. राज कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

प्रति,
वेतन लिपीक -१/ पेन्शन लिपीक , लेखा शाखा पो. अ. कार्यालय यवतमाळ.

प्रत डीपीजी लिपीक यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस

क्रमांक- पोअय/ सआलि-५/ सु.वे.नि-सपोउपनि-८११ /२०१९ 6156. यवतमाळ, दिनांक- 24 JUL 2020

# आ दे श.

या कार्यालयाचे आदेश जा.क्र.पोअया/सआली-२/सुधारीत वेतन नि/८२९० दिनांक ११.०७.२०१९ अन्वये से.नि.सपोउपनि/८११/ लक्ष्मण कपाट यांची वेतन निश्चिती करण्यात आली होती.त्यानुसार त्यांची ७ व्या वेतन आयोगानुसार खालील प्रमाणे सुधारीत वेतन निश्चीत्ती करण्यात येत आहे.

| मुळ आदेश (7 वा वेतन आयोगाप्रमाणे) | | | | सुधारीत आदेश (7 व्या वेतन आयोगाप्रमाणे) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक 01/01/2016 चे मुळ वेतन13600+2800=16400 x2.57 गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- 42148 | | | | दिनांक 01/01/2016 चे मुळ वेतन 13900+2800=16700x2.57 गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- 42919 | | | |
| वे.वा.दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकुण वेतन | वे.वा.दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकुण वेतन |
| ०१.०१.२०१६ | ४२८०० | --- | --- | ०१.०१.२०१६ | ४४१०० | --- | --- |
| ०१.०७.२०१६ | ४२८०० | १३०० | ४४१०० | ०१.०७.२०१६ | ४४१०० | १३०० | ४५४०० |

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,
वेतन लिपीक १/डिपीजी लिपीक आस्थापना शाखा,यवतमाळ.

क्रमांक- पोअय/ सआलि-५/ सु.वे.नि-पोना-६२३ /२०१९ 6155 यवतमाळ, दिनांक- 24 JUL 2020

# आ दे श.

या कार्यालयाचे आदेश जा.क्र.पोअया/सआली-२/सुधारीत वेतन नि/८२९० दिनांक ११.०७.२०१९ अन्वये से.नि.सपोउपनि/९८०/ रामदास चौधरी यांची वेतन निश्चिती करण्यात आली होती.त्यानुसार से.नि.सपोउपनि/९८०/ रामदास चौधरी यांची ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे खालील प्रमाणे सुधारीत वेतन निश्चीत्ती करण्यात येत आहे.

| मुळ आदेश (7 वा वेतन आयोगाप्रमाणे) | | | | सुधारीत आदेश (7 व्या वेतन आयोगाप्रमाणे) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक 01/01/2016 चे मुळ वेतन 13420+2800=16620x2.57 गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- 41685.4 | | | | दिनांक 01/01/2016 चे मुळ वेतन 13910+2800=16710x2.57 गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- 42944.7 | | | |
| वे.वा.दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकुण वेतन | वे.वा.दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकुण वेतन |
| ०१.०१.२०१६ | ४२८०० | --- | --- | ०१.०१.२०१६ | ४४१०० | --- | --- |
| ०१.०७.२०१६ | ४२८०० | १३०० | ४४१०० | ०१.०७.२०१६ | ४४१०० | १३०० | ४५४०० |

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

वेतन लिपीक १/डिपीजी लिपीक आस्थापना शाखा,यवतमाळ.

क्रमांक: पोअय/सआली-२/अंतीम रजा रोखीकरण फरक/ ८१५३ २०२०

यवतमाळ

24 JUL 2020

आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक :-अरजा-२४०१/७/सेवा-९ दिनांक १५.०१.२००१ शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक :- अरजा-२०१९ प्र.क्र.१२/सेवा-६ दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासुन राज्य शासकिय कर्मचारी यांना सुधारीत वेतन संरचना लागु केली आहे.त्या अनुषंघाने दिनांक ०१ जानेवारी २०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त निधन/स्वेच्छासेवानिवृत्त झालेल्या /होणा-या शासकिय कर्मचार-याच्या खाती जमा असलेल्या अर्जीत रजेच्या रोखीकरणाच्या परिगणणेसाठीचे वेतन हे मॅट्रीक्स मधील वेतन स्तरानुसार विचारात घेऊन त्यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या शिल्लक अर्जीत रजेच्या संबंधातील रजा वेतनाची समतुल्य रोख रक्कम एका ठोक रकमेत रोखीने प्रदान करण्यात यावी याबाबत नमुद करण्यात आले आहे.

या कार्यालयाच्या आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी दिनांक ०१ जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त/निधन/स्वेच्छासेवानिवृत्त होऊन त्यांना सुधारीत वेतन संरचनेतील वेतनाच्या आधारे शिल्लक अर्जीत रजेच्या रोख सममुल्याची रक्कम यापुर्वी अदा करण्यात आलेली आहे.त्यांना दिनांक २४.०५.२०१९ चे शासन निर्णयाच्या अनुषंघाने फरकाची रक्कम रोखीन प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव | ब.नं. | पदनाम | जमा रजा | ६ वे वेतन आयोगाप्रमाणे अदा करण्यात आलेली रक्कम | | ७ वे वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन संरचनेतील वेतन | सेवानिवृत्त/निधन/ स्वेच्छासेवानिवृत्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वेतन | ग्रेड पे | | |
| ०१ | माणिक भगत | ७६८ | सपोउपनि | ३०० दिवस | १४९१० | २८०० | ४६८०० | ३०.०९.२०१७ |

वर नमुद सेवानिवृत्त/मयत झालेल्या पोलीस कर्मचा-यांना शिल्लक अर्जीत रजेच्या रोख सममुल्य फरकाची रक्कम सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष २०५५(१६८)जिल्हा पोलीस बल-१ वेतन या लेखाशिर्षाखालील अनुदानातुन भागविण्यास व खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(एम राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक -०१

प्रत :- जिल्हा कोषागार अधिकारी/पेन्शन लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहीतीस व योग्य कार्यवाहीस्तव.

क्रमांकः-डिपी/३१-बी/अं.आ./ क.श्रे.लि.सुशिल मुदावणे/ 6140 /२०२० यवतमाळ, दिनांक- 27 JUL 2020

**अंतिम आदेश**

**वाचा** :- या कार्या.क्र. पोअय/डिपी/३१-बी/प्रा.चौ/मुदावणे+१/ज्ञापन/५०६५/२०२०, दि.२६/०६/२०२०.

**कसुरीचे स्वरूपः-**

आपण **श्री. सुशिल मुदावणे,** क. श्रे. लि. नेमणुक लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ येथे सहाय्यक वेतन लिपीक-०२ म्हणुन कार्यरत असुन १) व.श्रे.लि. परमेश्वर देशमुख, २) व.श्रे.लि. अनिल पेन्दोर, ३) क.श्रे.लि. श्रीमती सुषमा राजगडकर, ४) क.श्रे.लि. श्रीमती सरीता सुर्यवंशी, ५) क.श्रे.लि. सुशिल मुदावणे, ६) क.श्रे.लि. अंकुश ठाकरे, ७) क.श्रे.लि. पंकज गिरी असे एकुण ०७ मंत्रालयीन कर्मचारी यांना पोलीस वसाहत यवतमाळ येथील शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आले असतांना सुध्दा आपण त्यांना नियमाप्रमाणे घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना त्यांचे वेतनामध्ये नियमीत घरभाडे भत्ता देत होते. त्यांचे वेतनामध्ये घरभाडे भत्ता कपात करणे आवश्यक असतांना तसे न करता दुषीत हेतुने व नेमलेल्या कर्तव्यात हलगर्जीपणा, बेजबाबदारपणाचे कृत्य करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे आपण नेमलेल्या कर्तव्यात दुषीत हेतुने बेजबाबदार, बेशिस्त वर्तणुकीचे कृत्य करुन वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन केले असल्याचे केलेल्या प्राथमिक चौकशीत दिसुन आले आहे. आपल्या अशा कर्तव्यातील वृत्तीला आळा बसने गरजेचे आहे. आपण म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम-३ चे उल्लंघन केले आहे. म्हणून म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) मधिल तरतुदीनुसार पुढील **देय वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगितीची** शिक्षा प्रस्तावित शिक्षेबाबत दिनांक २६/०६/२०२० अन्वये ज्ञापन देण्यात आले होते. सदर ज्ञापन दिनांक १५/०७/२०२० रोजी स्विकारून सदर ज्ञापनाचे अभिवेदन आपण दिनांक २०/०७/२०२० रोजी सादर केले. सदर अभिवेदनाचे अवलोकन केले असता, ते पुर्णतः समाधानकारक दिसुन येत नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे **सुशिल मुदावणे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना त्यांच्या उपरोक्त कसूरीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) (चार) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता स्थगिती "(अपरिणामकारक) शिक्षा** देत आहे. सदर शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा वगळून व नैमत्तीक रजा सोडून अंमलात येईल.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून **४५** दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**( एम. राज कुमार )**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रति,** **श्री. सुशिल मुदावणे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**मार्फत** :- **प्रमुख लिपीक, लेखा शाखा, पो.अ.कार्या. यवतमाळ.**

२/- सोबत आदेशाच्या ०२ प्रती पाठविण्यांत येत असुन एक प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून विनाविलंब इकडिल कार्यालयास सादर करावी.

**प्रत :-** मंत्रालयीन कर्म.आस्था.लिपीक/ वेतन लिपीक (लिपीक कर्म.)/राजपत्र लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

क्रमांकः-डिपी/३१-बी/अं.आ./ क.श्रे.लि. सुशिल मुदावणे/ 6139 /२०२० यवतमाळ, दिनांक- 27 JUL 2020 ~~24 JUL 2020~~

## अंतिम आदेश

**वाचा** :- या कार्या.क्र. पोअय/डिपी/३१-बी/प्रा.चौ/मुदावणे+१/ज्ञापन/५२९९/२०२०, दि.०२/०७/२०२०.

**कसुरीचे स्वरूपः-**

आपण **श्री. सुशिल मुदावणे क. श्रे. लि.** सध्या नेमणुक लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ. आपण मंत्रालयीन कर्मचारी वेतन लिपीक, या कार्यसनावर कार्यरत असता पोउपअधि मुख्या यांचे दि.२२/०५/२०२०, दि.२९/०५/२०२० चे पत्रान्वये श्रीमती राजगडकर+७ यांची शासकीय निवासस्थान वसुलीचा आदेश काढण्यात आला असता आपण श्री.अंकुश ठाकरे सध्या नेमणुक आस्थापना शाखा, यवतमाळ यांचे घरभाडे वसुली काढलेली नाही. तसेच पोउपअधि (मुख्या) यांचे समक्ष श्री. अंकुश ठाकरे क.श्रे.ली. यांनी शासकीय निवासस्थानाचा ताबा घेतला नाही त्यामुळे त्यांचे घरभाडे वसुली काढलेली नाही असे खोटे कथन केले. प्रत्यक्षात श्री. अंकुश ठाकरे हे त्यांचे मित्र राम भेंडे (खाजगी व्यक्ती) यांचे सोबत त्या शासकीय निवासस्थानात राहत असुन त्यांचे ईलेक्ट्रीक बिल सुध्दा भरत होतो. आपण उपरोक्त प्रमाणे खोटे कथन करुन वरीष्ठांची दिशाभुल केली आहे. आपण वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे आपण नेमलेल्या कर्तव्यात दुषीत हेतुने बेजबाबदार, बेशिस्त वर्तणुकीचे कृत्य करुन वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन केले असल्याचे केलेल्या प्राथमिक चौकशीत दिसुन आले आहे. आपल्या अशा कर्तव्यातील वृत्तीला आळा बसने गरजेचे आहे. आपण म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम-३ चे उल्लंघन केले आहे. म्हणून म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) मधिल तरतुदीनुसार पुढील **देय वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगितीची** शिक्षा प्रस्तावित शिक्षेबाबत दिनांक ०२/०७/२०२० अन्वये ज्ञापन देण्यात आले होते. सदर ज्ञापन आपण दिनांक १५/०७/२०२० रोजी स्विकारून ज्ञापनाचे अभिवेदन आपण दिनांक २०/०७/२०२० रोजी सादर केले. सदर अभिवेदनाचे अवलोकन केले असता, ते पुर्णतः समाधानकारक दिसुन येत नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे **सुशिल मुदावणे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना त्यांच्या उपरोक्त कसूरीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) (चार) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता स्थगिती "(अपरिणामकारक) शिक्षा** देत आहे. सदर शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा वगळून व नैमत्तीक रजा सोडून अंमलात येईल.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून **४५** दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**( एम. राज कुमार )**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रति,** **श्री. सुशिल मुदावणे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**मार्फत :- प्रमुख लिपीक, लेखा शाखा, पो.अ.कार्या. यवतमाळ.**

**२/-** सोबत आदेशाच्या ०२ प्रती पाठविण्यांत येत असुन एक प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून विनाविलंब इकडिल कार्यालयास सादर करावी.

**प्रत :-** मंत्रालयीन कर्म.आस्था.लिपीक/ वेतन लिपीक (लिपीक कर्म.)/राजपत्र लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

क्र.पोअय/डिपी/३१-बी/प्रा.चौ/अं.आ./पोशि-१२०७ राठोड/ 6153 /२०२० यवतमाळ, दि. 27 JUL 2020

**अंतिम आदेश**

**अपचा-यांचे नांव :- पोशि-१२०७ अभिजीत राठोड, सध्या नेमणुक, पोलीस मुख्यालय,यवतमाळ**

**दोषारोप :-**

आपण पोशि/१२०७ अभिजीत राठोड, पो.स्टे.बाभुळगांव येथे नमणुकीस असुन दि.१३/०४/२०२० रोजी चे रात्री आपण आपला मित्र किरण परखडे सोबत रात्री चे सुमारास फिर्यादी अंकीता जाधव हिचे घरी गेला व तिचे घराचा दरवाजा वाजविला. फिर्यादी यांचे वडिलांनी दरवाजा उघडला असता अंकिता कुठे आहे तिला भेटायचे आहे तिला बाहेर बोलवा असे म्हणुन दारुच्या नशेत फिर्यादी सोबत वाद करुन आम्हाला जाऊ द्या नाहितर तुम्हाला पाहुन घेतो मी पोलीस आहे असे म्हणुन धमकावत होता. फिर्यादी नामे कु.अंकीता तानाजी जाधव हिने दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन आपणा विरुध्द दि.१३/०४/२०२० रोजी पो.स्टे.यवतमाळ शहर येथे अप नं. २०६/२० क ३५४(ड),४५१,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हा तपासावर आहे. आपले कृत्य हे पोलीस खात्याची प्रतीमा मलीन करणारे व शिस्तप्रीय पोलीस खात्याला अशोभनिय आहे. आपण अशा प्रकारचे गैरवर्तन करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी आपणास दि. १५/०४/२०२० रोजी निलंबित करण्यात आले असुन आपणा विरुध्द या कार्यालयाचे आदेश क्र:- डिपी/३१-बी/प्रा.चौ.राठोड /६७८/२०२० दि. १५/०४/२०२० अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात आली. तसेच दि. २३/०६/२०२० रोजी निलंबनाचे पुर्नविलोकन करुन आपणास निलंबन मुक्त करण्यात आले आहे.

नमुद कसुरी प्रकरणी आपणास **" पुढिल देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता स्थगीती "(अपरीणामकारक) ही शिक्षा का देण्यात येवु नये? तसेच निलंबन कालावधी पावेतोचा जशाच्या तसा (As Sach) का करण्यात येवु नये**? म्हणुन दि.२६/०६/२०२० अन्वये प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदरची कादानो आपण दि. १०/०७/२०२० रोजी स्वीकारली असुन त्यावर दि.१५/०७/२०२० रोजी स्पष्टीकरण सादर केले. अपचारी यांनी दिलेले स्पष्टीकरण हे समाधानकारक नाही. प्रकरणी खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे अपचारी **" पोशि-१२०७ अभिजीत राठोड, सध्या नेमणुक, पोलीस मुख्यालय,यवतमाळ"** यांना त्यांचे उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा आणी अपिले) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार **"पुढिल देय वार्षिक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परीणाम न करणारी ) दोन (२) वर्षाकरीता रोखणे" तसेच निलंबन कालावधी हा दि.१५/०४/२०२० ते दि. १६/०७/२०२० पावेतोचा जशाच्या तसा (As Sach)** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

अपचारी हे जर सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते आदेश मिळाल्याचे दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**(एम. राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक,यवतमाळ**